तिफण
ISSN 2231-573X, UGC Care Listed Journal
MAH MAR 34737/13/1/2009-TC



त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, शाखा कन्नड, आणि प्रेमकमल संस्था हतनूर आयोजित राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त तिफण कविता महोत्सवाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवी व चित्रपट गीतकार डॉ. दासू वैद्य यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना संशोधन परिषदेचे पदाधिकारी



हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गझलकार शम्स जालनवी, व मान्यवर

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक, शिवाजी हुसे यांनी रुद्रायणी ऑफसेट,सिडको, औरंगाबाद येथे छापून 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडारोड, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे प्रसिद्ध केला.
Email - huseshivaji@yahoo.com

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



# तिफण

वर्ष : ११ वे अंक : २ रा व ३ रा
जुलै ते डिसेंबर – २०२०

## लोककला विशेषांक

Scanned by CamScanner

# लोकसंस्कृतीचे लोककलेतून सहजसुंदर आविष्कार घडविणारा 'वासुदेव'

- डॉ. नानासाहेब पवार
मराठी विभाग
अण्णासाहेब मगर महाविद्यालय,
हडपसर. पुणे २८.

मानव हा समाजशील प्राणी आहे. मानवी जीवनाचा अभ्यास करताना मानवाचे जीवन हे व्यापक आणि बहुश्रुत असल्याचे आढळते. म्हणजेच निसर्ग, धर्म, पर्यावरण इत्यादी विविध घटकांचा मानवी जीवनात सोबत अतिशय जवळून संपर्क येतो, तसेच या घटकांशिवाय मानवी अस्तित्व असू शकत नाही. यावरून असे म्हणता येईल की, निसर्ग, पर्यावरण, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, औषध या मूलभूत गरजा सोबत 'धर्म' ही संकल्पना ही मानवी जीवनाशी निकटचे आणि महत्त्वाची बनली आहे. एवढेच नव्हे तर पारंपारिक मानवी जीवन हे पूर्णपणे 'धर्म' या संकल्पनेवर अवलंबून असल्याचे आपणास आढळून येते. म्हणजेच 'धर्म' या आधारस्तंभ वरून मानवी जीवनातील नित्यक्रम, मनोरंजन, खेळ, संस्कृती इत्यादी अवलंबून असत. त्यामुळे आपणास असे म्हणता येईल की, प्राचीन काळात मानव आपले जीवन जगत असताना जीवनावश्यक गरजा भागल्यानंतर रिकाम्या वेळेमध्ये मनोरंजनाची गरज भागवण्यासाठी विविध प्रकारच्या कला कुसरीकडे वळला. परिणामी माणसाने जीवन जगताना वेगवेगळ्या कलांचे शोध लावला. उदाहरणार्थ मूर्तिकला, चित्रकला, हस्तकला आणि लोककला इत्यादी होत. या कलांना मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

मराठी लोककलेचा अभ्यास करीत असताना लोककलेचा अर्थ आणि त्यात कोणत्या लोककलेचा समावेश होतो. या संबधीचे विवेचन करणे भाग आहे. सामान्यतः लोककला म्हणजे लोकांपासून चालत आलेली कलेची परंपरा होय. असा त्याचा ढोबळ अर्थ असतो. परंतु लोककलेच्या अभ्यासकांनी आणि तज्ञांनी केलेली लोककलेची व्याख्याही तपासणे हे जरुरीचे वाटते. म्हणून पुढील विवेचन लोककला म्हणजे काय याच्या संबंधीच्या तज्ञांनी दिलेल्या व्याख्या तपासणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील प्रख्यात संस्कृती कोश शास्त्रज्ञ पं. महादेवशास्त्री जोशी याची व्याख्या पुढीलप्रमाणे 'सर्वसाधारणपणे ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची परंपरा प्राप्त कला म्हणजे ती लोककला होय.'[१] वरील विषयावरून असे दिसून येते की, ग्रामीन भागात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची कला परंपरेने



एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आत्मसात केलेली कला म्हणजे लोककला होय. लोकाला हि लोकांनी तयार केलेली असते, त्यात अनेक कलांचा समावेश होतो. एकूण कला ६४ आहेत. धार्मिक, व्यावहारिक, वैयक्तिक अशा तीन भेदात त्या सामावलेल्या आहेत.

समृद्ध लोककलांचा वारसा महाराष्ट्राला प्राचीन काळापासून लाभला आहे. मौखिक आणि ग्रांथिक असे दोन प्रवाह अखंडपणेदिसून येतात. भारतात अनंत काळापासून नांदत आलेली कृषी संस्कृती, त्यातून व्यक्त होणाऱ्या ग्रामीण जीवनातील प्रतिमा, जनमाणसात रुजलेले लोकाचार आणि लोकरुढी याला रंजकतेने नटवित ही लोकसंस्कृती उभी आहे. लोकजीवनाचे भावविश्व त्यात प्रतिबिंबित होते. म्हणून लोकसंस्कृतीचा सहजसुंदर आविष्कार घडविणारी लोककला ही अनेक परिवर्तनातून आपला वाटा शोधीत जनलोकात आपले स्थान टिकवून आहे. या संदर्भात डॉ रामचंद्र देखणे लिहितात. 'महाराष्ट्राच्या लोककला, महाराष्ट्राच्या लोकभूमिका, लोकगीते, लोकसाहित्य या सर्वांच्या एकत्रिकरणातून उभी राहते ती महाराष्ट्राची लोकसंस्कृती... उद्बोधन, मनोरंजन आणि प्रबोधन घडवून 'कळनारी भाषा आणि पेलणारे तत्त्व देणारे' तसेच बोलीभाषेत वेदांतांचा अर्थ सांगून नैतिकतेची मूल्ये जनलोकात रुजविलेल्या या लोककला म्हणजे एक स्वतंत्र लोकविद्यापीठ आहे.'[२] म्हणजेच प्राचीन काळापासून नागरीकरण न झालेल्या म्हणजे आदिवासी आणि ग्रामीण जीवनातील कलेसाठी 'लोककला' (फोक आर्ट) ही संज्ञा योजिली जाते. निसर्गाशी संवाद साधीत जगणाऱ्या लोकसमूहांचे दैनंदिन जीवनाशी संबंधित परंतु कलात्मक आविष्कार लोककला म्हणून ओळखले जातात.

लोककला हा मानवाने स्वयंस्फूर्तीने निर्माण केलेला कलाप्रकार आहे. लोकांनी निर्माण केलेल्या कला म्हणजेच लोककला होत. लोकांनी निर्माण केलेल्या लोककलांचा अभ्यास करताना लोककलांचे प्रयोगरूप लोककला आणि इतर लोककला मुख्य दोन प्रकार पडतात. प्रयोगरूप लोककला हा मानवाने निर्माण केलेला लोककलेचा महत्त्वाचा प्रकार आहे. या लोककला प्रयोगांच्या माध्यमातून सादर केल्या जातात. त्यांना प्रयोगरूप लोककला असे म्हणतात. प्रयोगरूप लोककला विज्ञानामधील प्रयोगशाळेत सादर केल्या जात नसून समाज हीच प्रयोगरूप लोककलांचे प्रयोगशाळा असते. त्यामुळे प्रयोगरूप लोककलेच्या स्वरूपात साचेबद्धपणा आढळून येत नाही. म्हणजेच प्रयोगरूप लोकाला ह्या मुक्त, स्वच्छंद, सुरेखाच्या असतात. गोंधळ, वाघ्या मुरळीचे जागरण, वासुदेव, दशावतार, कीर्तन, सोंगी, भारूड, बहुरूपी, लोकनाट्य तमाशा अशा अनेक प्रयोगरूप लोककला महाराष्ट्रात लोकप्रिय असून गेल्या कित्येक वर्षापासून बहुजन समाजाच्या लोक रंजनाची गरज भागवित आहेत. लोककलेचा प्रकारांना कोणत्याही प्रकारची सहिता, घाट मर्यादा, बंधने नसतात. वेळ, काळ, प्रसंगानुसार मराठमोळ्या बहुजन समाजाचे मनोरंजन करण्याचे

कार्य या लोककलेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर केले गेले आहे व आजही काही प्रमाणात ग्रामीण भागात केले जाते. त्यामुळे रसिक, श्रोते मंडळी आपल्या धकाधकीच्या किंवा चाकोरीबद्ध जीवनापासून अलिप्त राहून या प्रयोगरूप कलेतील वासुदेव लोककलांच्या माध्यमातून, मनोरंजनाच्या, आनंदाच्या महासागराचे मनमुरादपणे चौकशी करत असतात. या लोककलेच्या माध्यमातून लोककलाकार आनंद, मनोरंजन यासोबतच उपदेशाचे डोस अल्पप्रमाणात का होईना देत असतो. या प्रयोजनासाठी अतिशय नाजूक स्वरूपात वाजवत तो रंजन व बोध या दोन्हीना स्थान देतो. प्राचीन कालावधीपासून मानवी जीवनात चालत आलेल्या प्रयोगरूप कलेतील वासुदेवाला अनन्यसाधारण महत्त्व होते. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आजही हे वासुदेव आहेत. त्याच्या या कला सादर होत असतात. या संदर्भात विश्वनाथ शिंदे लिहितात, 'ग्रामीण भाषेतील चटकदारपणा, कल्पकता, बुद्धिमत्ता आणि नैसर्गिकपणे अवतरणारे नाट्य अशी अनेक वैशिष्ट्ये या कलाप्रकारांनी आत्मसात केले आहेत. यामुळे ग्रामीण आणि नागरी लोकांना या प्रयोगरूप कला प्रकाराच्या आकर्षण वाटत असेल, लोकजीवनातील अनेक वैशिष्ट्ये या कलाप्रकारात अभिव्यक्त होत असल्यामुळे लोकजीवनात या कलाप्रकारांला अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळे या कला प्रकारांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.'[३] यावरून मराठी ग्रामीण लोक जीवनात आणि लोकसंस्कृतीत प्राचीन काळापासून वासुदेवाला एक आगळेवेगळे स्थान होते. प्राचीन काळापासून आजपर्यंत अस्तित्वात असलेली वासुदेव हि परंपरा लोकगायकांच्या परंपरेशी नाते सांगणारी आहे. लोकांना गीताच्या माध्यमातून श्रीकृष्णकथा, आध्यात्मिक गोष्टी, सामाजिक आशयावर नीतिबोधाची माहिती सांगून आपला उदरनिर्वाह करणारी ही परंपरा लोकजीवनात लोकांच्या जिव्हाळ्याचे होती. वासुदेवाशी कौटुंबिक संवाद साधला जात होता. त्याच्याजवळ आपल्या सुखदुःखाचा निरोप, आपली खुशाली जवळच्या नातेवाईकांसाठी दिली जात होती. या दृष्टीने लोकसंपर्काचे माध्यम म्हणूनही वासुदेवाला कौटुंबिकदृष्ट्या महत्त्व होते.

वासुदेवाच्या आरंभाचा शोध श्रीकृष्णापर्यंत जातो. असे म्हटले जाते की वासुदेव हा श्रीकृष्ण सखा आहे. श्रीकृष्णाचे असलेल्या जवळिकीची निदर्शकता म्हणून त्याने आपल्या मस्तकी मोरपिसांची शंक्वाकृती टोप धारण केलेला असतो. वासुदेव पारंपारिक पोशाखात वावरतो. अंगात घोळदार अंगरखा किंवा झगा, धोतर किंवा सलवार, उपरणे, डोक्यावर मोरपिसांची शंकूच्या आकाराची टोपी, काखेत झोळी, पायात घुंगराचे चाळ, कमरेला बांधलेला शेला, त्यात खोचलेली बासरी किंवा मुरली, एका हातात टाळ, दुसऱ्या हातात चिपळ्या, कपाळाला गंध, गळ्यात कवड्याच्या माळा, रुद्राक्षाच्या किंवा तुळशीचे मळा, केसरी रंगाचा ध्वज अशा वेशभूषेत वासुदेव दारासमोर, अंगणात किंवा रस्त्यावर देवतांचा नामघोष करीत एका हाताने टाळ वाजवत गाणी म्हणत पुढे चालत असतो.



साधारणता वासुदेव पहाटे पाच – सहाच्या यादरम्यान भिक्षा मागायला सुरुवात करतात. दररोजची मिळकत शंभर दोनशे रुपये, थोडेफार धान्य मिळते. वासुदेवाची भिक्षा मागण्याची गावे पूर्वी ठरलेली होती पण आता मात्र वासुदेवाची संख्या कमी झाल्यामुळे कोणी कोणत्याही गावी भिक्षा मागतो. ग्रामीण भागात लोक वासुदेवाकडे भिकारी म्हणून बघत नाहीत, त्यापेक्षा वाढणे हे धर्म कर्तव्य मानले जाते. त्यात तुच्छतेचा भाव नसतो. खेड्यापाड्यातील यात्रा जत्रांमध्ये वासुदेवाची उपस्थिती असते. वासुदेव तीर्थक्षेत्री नदीच्या काठाने फिरतात, कारण नदीच्या पात्रात उभे राहून वासुदेवास दान करणे पुण्यकर्म समजले जाते. वासुदेव दान मिळाल्यावर वडिलांचा उद्धार करतात. यात्रा-जत्रा नसल्या म्हणजे हे लोकं गावोगावी घरोघरी फिरून श्रीकृष्ण-चरित्र गीतांतून गाऊन भिक्षा मागतात. वासुदेव घरी येणे भाग्याचे मानले जाते. त्याचे कौतुक करून कपडे, धान्य व पैसे दिले जातात. असे असले तरी आज वासुदेवाला पारंपरिक जीवन पद्धतीने उदरनिर्वाह करणे कठीण होत आहे. सध्या वासुदेवाची नवी पिढी शिक्षण घेऊन पुरोगामी विचारांची बनत आहे. त्यामुळे पारंपरिक वासुदेवकृष्ण स्वीकारण्याकडे त्यांचा कल नाही.

अनंत काळापासून कृषीसंस्कृतीतून व्यक्त होणाऱ्याष ग्रामीण जीवनातील प्रतिमा, जनमाणसात रुजलेले लोकाचार आणि लोकरूढी हे सर्वच लोकसाहित्यविधांप्रमाणे लोककला हा लोकांच्या दैनंदिन जगण्याचा अविभाज्य भाग असतो. लोकजीवनात गीत, नृत्य, नाट्य, हस्तकला इ. सर्वच आविष्कार दैनंदिन गरजेचा भाग म्हणून आविष्कृत होतात. कोणत्या ना कोणत्या कामाशी, कृतीशी त्यांचा संबंध असतो. तो नम्रपणे आपली भूमिका मांडत असतो. या संदर्भात डॉ रामचंद्र देखणे वासुदेवाच्या एका गीताचा दाखला देताना लिहितात.

'कर जोडोनी विनवितो तुम्हा
तुम्ही वासुदेव म्हणा
नको गुंतु विषय कामा
तुम्ही आठवा मधुसुदना...'[४]

म्हणजेच न्यायशास्त्राप्रमाणे मालकी हक्क देताना त्याचे मूल्य घेणे हा व्यापार आणि मालकी हक्काचा त्याग हे दान. मराठी संतांनी वासुदेव, पांगुळ, पिंगळा, सरवदा, बाळसंतोष, जोशी या संतविचारांचे, विवेकाचे दान मागितले आहे. वासुदेव ही मराठी लोक संस्कृतीतील सात्विक लोकभूमिका आहे.

पहाटेच्या वेळी तो गावात येतो लोकांना जागे करतो दान पावलं दान पावलं हे पालुपद आळवीत टाळ चिपळ्यांचा तालात व पायातील घुंगराच्या नादात मंद पावले टाकत तो गाणे म्हणतो. दान झोळीत पडताच वासुदेव दात्याला वाडवडिलांची नाव विचारतो आणि दात्याच्या दिवंगत पितरांचा नामोच्चार करून महाराष्ट्रातील सर्व देवदेवतांना दान पावते



Scanned by CamScanner

करतो. स्वतःभोवती गिरकी मारून पावा किंवा टाळ चिपळ्या वाजून तो म्हणू लागतो.

'दान पावलं दान पावलं ॥
भीमशंकरी महादेवाला । कोल्हापुरी महालक्ष्मीला ॥
पंढरपुरी विठुरायाला । जेजुरीमंदी खंडेरायाला ॥
देहुगावी तुकयाला । आळंदीमंदी ज्ञानोबाला ॥
पैठणमंदी एकनाथाला । सज्जनगडी रामदासाला ॥
सदगुरुरायाला दान पावलं । जनता जनार्दनाला दान पावलं...' ॥[५]

'वडिलांच्या नावाने । अहो दान केले राव । दानधर्म पावन ।
जगदंबे नावानं । खंडेराय देवाला। शनि शिंगणापुरात
दान महादेवाला । वाडवडिलांची दान । माझ्या चिंधुभावाच्या ।
खैरनार रायाच्या । परवीन दादाने । दान केले वडिलांचे ।
आम्ही मेल्या मानवाचा । उद्धार करतो ...
दान पावलं दान पावलं...' ॥[६]

या दोन्ही संहितेचा विचार करिता वासुदेव ज्या भागात फिरतो त्या भागातील देव देवतांची नावे घेऊन त्या देव देवतांना दान पावते करतो. म्हणूनच वासुदेवाला लोकसंस्कृतितील भागवत संप्रदायिक म्हणतात. वासुदेवाच्या रूपाने संतांनी भक्ति चे दान मागितले. जीवन-मुक्तीचा आनंद सांगितला. परमेश्वराच्या व्यापक स्वरूपाची ओळख करून दिली. विकारमुक्त होऊन सत् प्रवृत्तीवर वाटचाल करण्याचा मार्ग सांगितला आहे.

वासुदेव बहुधा पौराणिक कथागीते गातो. या देव-देवतांच्या कथागीतांवर काही लौकिक आख्याने घेऊन लोकांचे उद्बोधन करण्याचा प्रयत्न करतो. कथागीते गाताना वासुदेव जणू एकपात्री नाट्य सादर करतो. शेवटी ज्यांनी दान दिले त्यांना तो आशीर्वाद देतो. त्यावेळी तो आपल्या गीतातून म्हणतो .

'अन्नदान, गोदान, भूमीदान, मोतीदान ।
वस्त्रदान, भांडदान, सोनंदान, रूप दान ।
कोणी वाटी कन्यादान... ।
बारा ब्रम्ह, आकाराचंद्र, संक ब्रम्ह, तुका विष्णू ।
तृप केला महावी ऐसा गुण महादेव । ...
महादेव हरहर महादेव दत्त ...'[७]

'पोटासाठी गातो गाणी । ऐका वासुदेवाची कहाणी ॥



वासुदेव आला रे वासुदेव आला । हरिनामाचा भजन केला ॥
वासुदेव घालितो फेरा । काहीतरी दान पुण्य करा ।
नाहीतर जातो माघारा ॥...'[८]

अशा कथा गीतांचे सादरीकरण निरनिराळ्या अनुरूप आरोह अवरोहाच्या आणि त्याला पूरक अशा सात्विक अभिनयाच्या साह्याने प्रभावी करतो. पोटासाठी भटकंती करणारा वासुदेव दान नाही मिळाले तरी नाराज होत नाही.

वासुदेवाच्या कथात्म गीतात श्रीकृष्ण कथांचे वेगळेपण आहे. लहान सूटसुटीत पण स्वतंत्र अशी ही कथा गीते असतात. श्रीकृष्णाच्या जीवनातील एक छोटेखानी कथागीत असे त्याचे स्वरूप असते. श्रीकृष्ण जन्म, यशोदा व कृष्ण यांच्यातील भावबंधन, कृष्णाच्या बाललीला, पूतनावध, कालियामर्दन यासारख्या घटना प्रसंगावर आधारित ही कथा गीते प्रवाहित आहेत. कालियामर्दन या कथागीतातील प्रसंग वासुदेव किती सुबोध व सोप्या भाषेत कथन करताना तो म्हणतो

'कृष्णानं बाई, मारली की बुडी सावळ्यानं
ह्या मारली की उडी गेला यमुनेला तळाला
कालियाच्या घडाला कृष्ण झुंजतो
कालियाला मुडदा कालियाचा पाडला...'[९]

या गीतात यमक बुडी उडी, तळाला घराला, असा जुळलेला आहे. गीताची भाषा प्रसादिक व लोकजीवनातील नित्याच्या वापरातील आहे.

तर काही वासुदेवाच्या कृष्ण गीतात त्याच्या खोड्यांविषयी गोपींनी केलेल्या तक्रारी आहेत. त्याच्या खोड्यांनी संत्रस्त झालेल्या गोपींनी त्याला उधळीला बांधण्याचा केलेला निश्चय आहे. या गीतातून त्याचा निर्देश आपणास होतो.

'बांधा उखळाला, याला बांधा उखळाला
नंदाचा पोर, याला बांधा उखळाला
न कळत हरी हा घरात शिरतो,
दही दूध लोणी चोरनि खातो
सोडू नका याला आता बांधा उखळाला नंदाचा पोर,
याला बांधा उखळाला...'[१०]

मानवी जीवनातील सामाजिक आशयाचे उपयोजन करताना वासुदेव आपल्या गीतातून सद्यस्थितीचे चित्रं उभे करतो. त्यातून त्याची लोकौद्धाराची तळमळ दिसते. लोकांनी नीतीने वागावे. सद्गुणांची कास धरावी. सदाचरणी व्हावे म्हणून तो लोकशिक्षकाच्या भूमिकेतून उपदेश करतो. त्याच्या उपदेशपर रचना धर्म, अध्यात्म, लौकिक जीवनावर आधारित



Scanned by CamScanner

असतात. वासुदेवाचा वावर लोकजीवनात नित्य असल्याने समाजातील आचार, विचार, चालीरीती, गुणदोष, धार्मिकता, अधार्मिकता, सदगुण, दुर्गुण आणि व्यक्तीचे वागणे, व्यक्तीस्वभाव इत्यादी त्याला परिचित असतात. माणसाने गर्व, अहंकार, अभिमान बाळगू नये. अहंकाराचा त्याग करून त्याने जीवनातील उत्कट आनंद घेण्याचे तो पुढील गीतातून सांगतो. त्यासाठी तो पुराणातील दाखले ही देतो.

'अभिमानानं कैक बुडाले, सांगू कोण कोण
दहाशीर, वीसभुजा, तो एक रावण
कुळशील वंश बुडाला, पहा दुर्योधन
भस्मासुर भस्म झाला, धरून अभिमान...'[११]

अशाप्रकारे बदलत्या समाजजीवनातील वृत्तीप्रवृत्तीचे दर्शन त्याच्या काही गीतातून घडते. जे घडत आहे ते चांगले नसल्याची खंत व्यक्त करतो. त्याचे समाज निरीक्षण अचूक असते. धर्मानुसार आचरण करण्यापेक्षा माणसे चुकीच्या पद्धतीने वागत आहेत. शेतकरी कुटुंबात जन्माला आलेला माणसाला वासुदेव काळ्या आईची सेवा करायला सांगतो. गायीला मारू नकोस, गर्व धरू नको, म्हातारी झालेली गाय कसायला विकू नकोस, आई-वडील मोठे भाऊ यांची मर्जी सांभाळ, आई-वडिलांची सेवा कर असा सोप्या भाषेतील उपदेश तो पुढील गीतातून तो सहज करून जातो. समाजजीवनाचे सद्यकालीन स्थितीचं वर्णन करताना तो म्हणतो,

'बळीच्या वंशी जन्म घेतला, काळीचा धंदा सोडू नको,
ऐक पराण्या तुला सांगतो,
हरिभजनाविण राहू नको, दिली देवानं धनसंपदा,
गर्व मनामधि धरु नको,
चरत गाय ती शेती आली, तिच्या मुखावर मारु नको,
झाली म्हातारी गाय बाप्या कसाबाला विकू नको,
पोर घातलं शाळमधी, लाड त्याचा तू करू नको,
वडील बंधू बापाप्रमाणे, मरजी सोडून बोलू नको,
पित्याच्या वंशी जन्म घेतला, त्याच्या सेवेला चुकू नको,
आईच्या पोटी जन्म घेतला, वाईट वंगाळ बोलू नको,
दोघा भावांचा तंटा लागला, सरकारांमध्ये जाऊ नको...'[१२]

म्हणजेच शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये अशी एक लोकोक्ती येथे तो सांगतो. याचा प्रत्यय या गीतातून आपल्याला येतो. कोणत्याही स्त्रीकडे वाईट नजरेने पाहू नकोस, अहंकार बाळगू नकोस, लबाडी करू नकोस, मुलांना शिक्षण दे, कोणाचे घर बुडवू नकोस असे



विविध प्रकारचे उद्देश वासुदेव या गीतातून केला आहे. वरील गीतातून व्यक्त होणारा आशय अनंतफंदीने लिहिलेल्या 'बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्ग सोडून नको' या फटक्यातील अशयाशी साम्य दर्शवणारा आहे.

सर्व समाजाचे निरीक्षण करताना समाजाची नैतिकता कशी ढासळत चालली आहे. याचे चित्रण वासुदेव आपल्या गीतातून मांडतो

'लबाड दुनिया बालंट निघाली कशी कळी फिरली,
डोळ्यावरती धुंदी चढली वळख नाही धरली ॥ धृ ॥
पुत्रासाठी नवस केले गावाच्या मारोतीला,
चांदी सोन्याचा पाळणा वाहीन देवा मी तुझला,
नवस केला पुत्र झाला बरा देव पावला,
हातात खेटर घेऊन बापाच्या अंगावर गेला,
दोन बायका कशाला केल्या घरात चाललं भांडण,
नवरा जातो सोडवाया मारिती झाडूच्या दांड्याने,
काशी केली यात्रा केली मिशा काढूनी आला,
जिवंत होते आई बाप तेव्हा अन्न नाही दिले दोघांना,
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ,
लबाड दुनिया बालंट निघाली कशी कळी फिरली,
डोळ्यावरती धुंदी चढली वळख नाही धरली. ।।धृ।।'[१३]

या गीतातून वासुदेव नीतिबोध करताना दिसतो. दुनिया लबाड होत चालली आहे. माणसांच्या डोळ्यावर धुंदी चढली आहे. ज्या पुत्रासाठी नवस केले तोच पुत्र आई वडिलांना मारतो. दोन बायकांच्या नवऱ्याची स्थिती कशी होते. पैशासाठी स्वतःच्या मुलीचा विवाह वृद्ध नवऱ्याशी लावणारे बाप समाजव्यवस्थेत आहेत यावर भाष्य करतो. वा लोकांच्या डोळ्यात अंजन घालतो.

**निष्कर्ष :**

१. वासुदेव हा गायक, उत्तम कथाकथनकार, लोकमानसाचे उत्तम ज्ञान असणारा लोकसंस्कृतीचा पाईक आहे. या सर्वांमधून व्यापक तत्वज्ञान सहज सोप्या भाषेत मांडतो. समाजावर सुस्कार करणे हि आपली जबाबदारी आहे असा मानणारा तो लोककलावंत असतो.

२. वासुदेवाच्या गीतांची रचना साधी, चाली सोप्या असतात. त्यात उपमा अलंकारांचा सोस नसतो. वासुदेवाच्या लोकगीतात नृत्य, संगीत व नाट्य यांची साथ लाभलेले असल्यामुळे त्याच्या कलाविष्काराला एकपात्री नाट्य प्रयोगाचे



Scanned by CamScanner

स्वरूप प्राप्त होते. लोकसंपर्काचे व लोकसंवादाचे प्रभावी माध्यम म्हणूनही पूर्वी वासुदेवाचे महत्त्व होते. परंतु आज ते कमी झालेले आहे.

३. वासुदेवही संस्था प्राचीन काळापासून 'धर्म' उपासनेचे आणि लोकशिक्षणाचे कार्य करीत आहे. या संस्थेने लोकांना धर्मकथा सांगितली. नीतीबोध केला व अध्यात्माची ओळख करून दिली आहे. त्याची गीते शाहिरी परंपरेत बसणारी आहेत.

४. वासुदेवाच्या गीतात कृष्णकथा, पुराणकथा, संतमहिमा, भक्तीमहिमा, अध्यात्मकथा त्याचबरोबर बदलत्या समाजव्यवस्थेचे व कौटुंबिक नात्याचे चित्रण येत असते. पुराणातील मूळ कथाबंद कायम ठेवून वासुदेव लौकिक जीवनाचा अनेक संदर्भ देऊन हा कथाबंद विकास साधतो. तसेच बदलत्या समाजजीवनाचे जीवनमूल्यांचे चित्रण त्याच्या गीतात असते.

५. वासुदेव गात असलेली गीते मौखिक परंपरेने त्यांच्या घराण्यात चालत आलेली असतात. कल्पनाविलास, घटना प्रसंगाचे चित्रण, भावनाविष्कार, विचार सौंदर्य आणि निवेदन कौशल्ये यासारख्या वाग्मयीन गुण त्यांच्या रचनेत असतात.

६. वासुदेवाच्या गीतांची निर्मिती समूह मनातून होत नसली तरी त्याच्या गीताचे आवाहन समूह मनाला असते. समूहमनाच्या भावभावना लोकमाणसांचा विचार करत तो त्यात मांडत असतो.

७. वासुदेवाच्या विविध गीतातील लालित्य, प्रासादिकशैली, लोकभाषेचावापर, प्रसंगवर्णन, व्यक्तीवर्णन, लक्षणीय असते. त्याच्या या गीतांना नृत्य व संगीताची साथ लागल्यामुळे ही गीते अधिक प्रत्येयकारी असतात. सात्विक मनोवृत्तीचा व साद्विचाराचा प्रसारक म्हणून त्याकडे पहिले जाते.

**समारोप :**

महाराष्ट्राच्या लोककलेमधून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कौटुंबिक इत्यादींची माहिती मिळते. हि परंपरा महाराष्ट्राच्या लोककला अनेक समाजात प्रचलित होती. लोकपरंपरेत गोंधळी, वाघ्या, मुरळी व वासुदेव या तीनही लोककलाकारांच्या लोकाविष्कारात गीत, नृत्य, संगीत व अभिनय हे नाट्य गुण दिसून येतात. त्यांची गाणी असे सर्व संपन्न असतात. लोकसंस्कृतीच्या जडणघडणीमध्ये त्यांचा फार मोठा वाटा आहे. जिथे मानव तिथे लोककथा व लोककला होत्या. त्यामुळे लोककलेची त्याची व्याप्ती फार मोठी आहे. लोककलेसाठी जात, धर्म, देश, सुसंस्कृतपणा असे बंधन नव्हते. वासुदेव ह्या मानवी लोककलेतून लोकजीवनाला उद्‌बोधन, प्रबोधन, व नितीविचार दिला. यातून आदर्श समाजजीवन घडविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. प्रसंगानुरूप सुख-दुःख, आनंद, द्वेष, मत्सर



इत्यादींशी भावना व्यक्त केली. महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांची व स्त्री जीवनाची माहिती त्यांचे दुःख त्यांचे कलागुण कौशल्य यांच्या धार्मिक कल्पना व्यवसाय येथे त्यांचे राहणीमान इत्यादींचे वर्णन या लोककलेत लोकनृत्य व लोकनाट्य प्रतिमेत झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**


१. जोशी पंडित महादेव शास्त्री, 'भारतीय संस्कृती कोश' खंड क्र. ८ प्रथम आवृत्ती ३१ ऑगस्ट १९७४. पृ. ३९१

२. डॉ. देखणे रामचंद्र, 'महाराष्ट्राच्या लोककला' facebook.com संस्कारभारती – कोकण प्रांत अजित लो १६ सप्टेंबर २०११

३. डॉ. शिंदे विश्वनाथ, 'लोकसाहित्य मीमांसा' स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे पृ. २७

४. डॉ. देखणे रामचंद्र, 'महाराष्ट्राच्या लोककला' facebook.com संस्कारभारती – कोकण प्रांत अजित लो १६ सप्टेंबर २०११.

५. डॉ. देखणे रामचंद्र, 'महाराष्ट्राच्या लोककला' facebook.com संस्कारभारती – कोकण प्रांत अजित लो १६ सप्टेंबर २०११.

६. सुपेकर साधू नाना (वासुदेव) मु. पो. मेढद ता. बारामती मुलाखतीतील वृतांत.

७. मांडे प्रभाकर, 'लोकरंगभूमी' प्रथमावृत्ती औरंगाबाद १९९४. पृष्ठ २७२.

८. वाघ रामभाऊ शंकर (वासुदेव) मु. पो. डोर्लेवाडी ता. बारामती मुलाखतीतील वृतांत.

९. व्यवहारे शरद, 'लोकसंस्कृतीचा अनंतप्रवाह' प्रथमावृत्ती पुणे १९९९, पृष्ठ १२७.

१०. ढेरे रा. चिं., 'लोकसंस्कृतीचे उपासक' पुणे १९९६, पृष्ठ १६.

११. व्यवहारे शरद, 'लोकसंस्कृतीचा अनंतप्रवाह' प्रथमावृत्ती पुणे १९९९, पृष्ठ १३९.

१२. खंदारे साहेबराव, 'लोकसाहित्य : शब्द आणि प्रयोग' प्रथमावृत्ती पुणे २००४, पृष्ठ ४६.

१३. वरखेडे र.ना. (संपा.) 'लोकसाहित्य' सु.आ. नाशिक २००४, पृ. ९८.


*****



Scanned by CamScanner